अध्ययन अक्षम असलेल्या इयत्ता १ ली ते इयत्ता १२ वी च्या विद्यार्थ्यांना विशेष सवलती देण्याबाबत..

# महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
शासन निर्णय क्रमांक : संप्रप २००६/(२३१/०६)/प्राशि ५,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ७ सप्टेंबर, २००६.

संदर्भ : १) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्रमांक : संकीर्ण १०२१/(१५/०१)/प्राशि ५, दिनांक १३/११/२००१.
२) शासन परिपत्रक, शालेय शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण १०२१/(१५/०१)/प्राशि ५, दिनांक २३ सप्टेंबर, २००३.
३) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्रमांक : एसएससी १०९९/(१५१/९९)/उमाशि २, दिनांक २८/११/२०००.

**प्रस्तावना :**

संदर्भाधीन शासन निर्णयान्वये इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंतच्या अध्ययन अक्षम असलेल्या विद्यार्थ्यांकरिता विविध सवलती वेळोवेळी देण्यात आलेल्या आहेत. अध्ययन अक्षमता या संवर्गामध्ये डिसलेक्सिया, डिसकॅलक्युलिया, डिसग्राफिया याचा समावेश आहे.

२. अध्ययन अक्षम असलेल्या विद्यार्थ्यांच्या अडचणी जाणून घेवून त्यांना अधिक सुविधा व सवलती देण्यासंदर्भात मा.उच्च न्यायालय मुंबई येथे याचिका क्रमांक १७४४/२००५ दाखल करण्यात आलेली होती. प्रस्तुत याचिकेच्या सुनावणी दरम्यान मा.उच्च न्यायालयाने या क्षेत्राशी संबंधित असलेल्या व्यक्तींची तज्ञ समिती गठीत करुन, समितीच्या माध्यमातून अशा विद्यार्थ्यांकरिता शालेय शिक्षण स्तरावर विविध सवलती व सुविधा देण्याबाबत अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार या क्षेत्रातील तज्ञांची समिती गठीत करुन समितीने चर्चेअंती तयार केलेली योजना मा.उच्च न्यायालयास सादर करण्यात आली होती. प्रस्तुत योजनेवर विचार करुन मा.उच्च न्यायालयाने त्यांच्या दिनांक २० जुलै, २००६ च्या निर्णयान्वये राज्यातील अध्ययन अक्षम असलेल्या विद्यार्थ्यांना द्यावयाच्या विविध सुविधा व सवलतीसंदर्भात निर्देश दिले आहेत. मा.उच्च न्यायालयाचे निर्देश विचारात घेऊन, राज्यातील सर्व शाळा तसेच आय.सी.एस.ई, सी.बी.एस.ई. व महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक परीक्षा मंडळ यांची संलग्नता असणाऱ्या सर्व शाळा प्रमुखांच्या निदर्शनास वरील आदेश आणण्याच्या दृष्टीने शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक : संप्रप २००६/(२३१/०६)/ प्राशि ५,
दिनांक ७ सप्टेंबर, २००६ चे जोडपत्र "अ"

**अध्ययन अक्षमता असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त करणे त्याबाबतची कार्यपद्धती.**

: अध्ययन अक्षम असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्याची कार्यपद्धती :-

१) मा.उच्च न्यायालयाने गठीत केलेली तज्ञ समिती, अध्ययन अक्षम असणाऱ्या विद्यार्थ्यांची चाचणी करण्यासाठी प्रमाणित निवडसूची (standardised checklist) तयार करेल.

२) शाळेतील ज्या विद्यार्थ्यांची प्रगती असमाधानकारक असेल अशा सर्व विद्यार्थ्यांची शाळांनी इ. ३ री व ६ वी या स्तरावर, वरील प्रमाणित निवडसूचीच्या आधारे चाचणी घेणे शाळांवर बंधनकारक राहील.

३) विद्यार्थी अध्ययन अक्षम असल्याबाबत संशयीत असेल अशा विद्यार्थ्यांच्या बाबतीत त्याचे पालक व संबंधित शिक्षक यांच्या परस्पर चर्चेअंती अशा विद्यार्थ्यांची (Neurologist), मानसोपचार तज्ञ किंवा विशेष शिक्षक (Special Educator) यांच्यामार्फत व्यावसायिक केंद्रावर तपासणी करता येईल. ग्रामीण भागामध्ये वरील तज्ञांव्यतिरिक्त बालरोग तज्ञ व अध्ययन अक्षमता या क्षेत्रामध्ये प्रशिक्षित असलेल्या सामान्य वैद्यकीय अधिकाऱ्यांकडूनही तपासणी करता येईल. अशा तपासणीकरिता येणारा सर्व खर्च संबंधित पालकांनी करणे आवश्यक राहील.

४) वरील अनुक्रमांक २ किंवा ३ मधील तपासणीअंती विद्यार्थी अध्ययन अक्षम असल्याचे निष्पन्न झाल्यास सदर चाचणी घेणाऱ्या तज्ञांकडून वैद्यकीय प्रमाणपत्र घेऊन ते शाळेमध्ये दाखल करावे. प्रत्येक शाळेने त्या शाळेमध्ये शिकत असलेल्या अध्ययन अक्षम असणाऱ्या विद्यार्थ्यांची स्वतंत्र नोंदवही ठेवावी व अशा विद्यार्थ्यांच्या वार्षिक प्रगतीच्या नोंदी ठेवण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याची स्वतंत्र अभिलेखवही ठेवावी. तसेच शाळेतील प्राचार्य व शिक्षकांनी अशा विद्यार्थ्यांना देय असलेल्या किंवा नमूद केलेल्या सुविधा व सवलती यांची माहिती संबंधित विद्यार्थ्यांच्या पालकांना सूचित करावी.

**अध्ययन अक्षम असणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता सुविधा**

: डिसलेक्सिया, डिसकॅलक्युलिया व डिसग्राफिया या स्वरुपाच्या अध्ययन अक्षम असणाऱ्या विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे सुविधा व सवलती देण्यात याव्यात :-

१) इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना लेखी परीक्षेसाठी सामान्य वेळेपेक्षा २५ टक्के अधिक वेळ वाढवून देण्यात यावी.

२) इयत्ता १ ली ते ९ वी पर्यंत अध्ययन अक्षम असणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रत्येक लेखी परीक्षेबरोबर तोंडी परीक्षाही संबंधित विषय शिक्षकांनी घ्यावी. विद्यार्थ्यांनी लेखी व तोंडी परीक्षेतील मिळविलेले गुण विचारात घेवून अंतिम निकाल घोषित करुन त्याआधारे वर्गोन्नती घोषित करावी.

३) अध्ययन अक्षम असणाऱ्या विद्यार्थ्यांना लेखी परीक्षेसाठी लेखनिकाची मदत घेता येईल. असे लेखनिक संपूर्ण पेपरसाठी किंवा पेपरच्या काही भागासाठी घेता येईल. अध्ययन अक्षम विद्यार्थ्यांना उत्तर लिहिण्यासाठी टंकलेखन यंत्राचा वापर करण्याची सुविधाही घेता येईल. संबंधित संस्थेने शक्य तो अशा विद्यार्थ्यांची मागणी असल्यास टंकलेखन यंत्र, टेबल, खुर्ची व बसण्याची व्यवस्था स्वतंत्र वर्गामध्ये करावी.

अशा विद्यार्थ्यांना स्वतंत्र लेखनिक पुरवावयाचे झाल्यास पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी :-

अ) संबंधित विद्यार्थी/ पालक यांनी संबंधित शाळेच्या प्रमुखांशी सल्लामसलत करुन स्वतंत्र लेखनिकाची व्यवस्था करावी.

ब) असा लेखनिक संबंधित विद्यार्थ्याला शिकविणाऱ्या शिक्षकांपैकी नसावा. परंतु त्या विद्यार्थ्यांचे बोलणे समजू शकणारा असावा. अध्ययन अक्षम असलेला विद्यार्थी शिकत असलेल्या वर्गापेक्षा किमान एका इयत्ते खालील वर्गातील असावा.

क) लेखनिकाची निवड अत्यंत काटेकोरपणे करावी व अध्ययन अक्षम विद्यार्थी जे सांगेल केवळ तेच लिहिण्याच्या सूचना लेखनिकाला देण्यात याव्यात.

ड) या सुविधेचा गैरवापर करणार नसल्याचे हमीपत्र संबंधित लेखनिकाकडून परीक्षा सुरु होण्यापूर्वी घेण्यात यावे.

इ) अध्ययन अक्षम असणाऱ्या विद्यार्थ्यांना शालांत परीक्षेसाठी त्यांच्या इच्छेप्रमाणे त्यांच्या घराजवळील केंद्र देण्यात यावे.

इयत्ता १ ली ते ९ वी पर्यंतच्या अध्ययन अक्षम विद्यार्थ्यांना संबंधित शिक्षक किंवा पर्यवेक्षक प्रश्नपत्रिका वाचून दाखवू शकतील परंतु ती समजावून सांगू नये.

डिसलेक्सिया व डिसग्राफिया या स्वरुपाच्या अध्ययन अक्षमता असणाऱ्या विद्यार्थ्यांना इ.१ली ते इ. ९ वी पर्यंतच्या इंग्रजी वगळता इतर भाषा विषयातून सूट घेता येईल. संबंधित विद्यार्थी अशा विषयाचा अभ्यासक्रम व तासिका यांना वर्षभर वर्गामध्ये उपस्थित राहू शकेल. परंतु या विषयाच्या परीक्षेतून त्यांना सूट देण्यात यावी.

डिसकॅलक्युलिया या स्वरुपाची अक्षमता असणारा इ.१ ली ते ४ थी पर्यंतचा विद्यार्थी त्या त्या वर्गातील अभ्यासक्रमानुसार गणित विषय शिकेल. तथापि अशा विद्यार्थ्याकडून गणित विषयामध्ये गुणाकार व भागाकार, बेरीज व वजाबाकी इत्यादीच्या चिन्हांची अदला-बदल करणे व संख्या उलटी लिहिणे (उदा.१२ ऐवजी २१, ३१ ऐवजी १३ इत्यादी) अशा चुकांकडे दुर्लक्ष करावे. परंतु त्यांनी गणिती आकडेमोड व्यवस्थित व अचूक केली आहे याकडेच लक्ष द्यावे.

डिसकॅलक्युलिया असलेल्या विद्यार्थ्याला पुढील सुविधा देण्यात याव्यात :-

१) इयत्ता ५ वी ते ६ वी तील विद्यार्थी इ. ५ वी चा गणित विषय घेईल. इयत्ता ७ वी ते ८ वी चा विद्यार्थी इयत्ता ६ वी चा गणित विषय घेईल. राज्य मंडळाच्या इयत्ता ९ वी व १० वी च्या विद्यार्थ्यास इयत्ता ७ वी चा विषय घेता येईल.

२) आय.सी.एस.ई. व सी.बी.एस.ई. या परीक्षा मंडळाशी संलग्नित असलेल्या शाळांमधील इयत्ता ९ वी व १० वी च्या विद्यार्थ्यास संबंधित मंडळाच्या अभ्यासक्रमानुसार गणित विषयातून सूट घेण्याची सुविधा घेता येईल. वरीलप्रमाणे गणित विषयातील सवलती सर्व संबंधितांनी विद्यार्थ्यांना द्याव्यात. खालील वर्गाचे गणित शिकविण्याची सुविधा शाळांमध्ये उपलब्ध नसल्यास अशा विद्यार्थ्यांच्या पाल्यांना गणित विषय खाजगीरित्या शिकण्याचा पर्याय उपलब्ध राहील. परंतु परीक्षा मात्र संबंधित शाळांकडूनच घेतली जाईल.

३) अध्ययन अक्षम असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या वाक्यरचना व वर्णलेखन (स्पेलिंग) चूका यांच्याकडे दुर्लक्ष करुन उत्तरातील गाभा फक्त लक्षात घेऊन मूल्यांकन करण्यात यावे.

४) भूगोल विषयातील नकाशामधील दिशादर्शक चुकांकडे दुर्लक्ष करावे.

५) गणित विषयातील परिगणनेमध्ये संख्येचा उलटसुलट लिहिणे याकडे दुर्लक्ष करुन विद्यार्थ्यांनी वापरलेली पद्धती व केलेली परिगणना अचूक आहे किंवा नाही, हे तपासूनच मूल्यांकन करावे.

६) इयत्ता १ ली ते ९ वी पर्यंतच्या अध्ययन अक्षमता असणाऱ्या विद्यार्थ्यांना लेखी परीक्षेमध्ये आकृति, नकाशे, आलेख, तक्ते इत्यादीमधून सूट देण्यात यावी. अशा प्रश्नांचे/उप प्रश्नांचे गुण प्रश्नपत्रिकेतील इतर प्रश्नांना प्रमाणशीर पद्धतीने वाटण्यात यावेत. अशा विद्यार्थ्यांकरिता पुरवणी प्रश्न देण्यात यावेत.

७) इयत्ता १ ली ते ९ वी पर्यंतच्या अध्ययन अक्षम विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास अशा विद्यार्थ्यांना एकत्रितपणे २० ग्रेस गुण देण्यात यावेत. सदरहू २० गुण एकाच विषयामध्ये किंवा एक किंवा इतर विषयांमध्ये विभागून देता येतील.

८) अध्ययन अक्षम विद्यार्थ्यांना कर्सिव्ह लिपीमध्ये लिहिण्याचे बंधन घालू नये. त्याऐवजी त्याना सामान्य लिपीमध्ये (Print) लिहिण्याची अनुमती देण्यात यावी.

९) श्रवणदोष असणाऱ्या विद्यार्थ्यांना वर्गामध्ये टेपरेकॉर्डर वापरण्याची सुविधा देण्यात यावी.

१०) अध्ययन अक्षम असणाऱ्या विद्यार्थ्यांना गृहपाठ/वर्गपाठामध्ये विस्तृत उत्तरे लिहिण्यापासून सूट देण्यात यावी. त्याऐवजी त्यांना मुद्दे स्वरुपात (पॉईंट फॉर्ममध्ये) उत्तरे लिहिण्याची सुविधा राहील.

११) वरील अक्षमता असणाऱ्या विद्यार्थ्यांना विशिष्ट स्वरुपाच्या अडचणींमुळे काही प्रकरणी अतिरिक्त सुविधेची गरज भासल्यास त्यांनी तशी मागणी विहित कागदपत्रांचे व चांचणी निष्कर्षांच्या आधारे संबंधित शाळांच्या प्राचार्यांकडे मागणी करावी. संबंधित प्राचार्यांनी या मागण्या संबंधित परीक्षा मंडळाकडे अग्रेषित कराव्यात. अशा मागण्यांवर प्रत्येक प्रकरणी बोर्डाने सुविधा देण्याबाबत कार्यवाही करावी.

१२) अध्ययन अक्षमता असल्याचे निदान झालेल्या विद्यार्थ्यांना उपचारात्मक शिक्षण देण्याची सुविधा उपलब्ध करणे योग्य होईल.

१३) खालील सर्वसाधारण शिफारशींचे पालन करण्यात यावे :-

(१) अध्ययन अक्षम विद्यार्थ्यांना ओळखून त्यांच्या संदर्भात वरील सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने सर्व शिक्षक व प्राचार्यांचे जागृती अभियान राबविण्यात यावे.

(२) शिक्षकांच्या प्रशिक्षणामध्ये अध्ययन अक्षम विद्यार्थ्यांकरिता स्वतंत्र प्रशिक्षण घटक संच पुरविण्यात यावेत व या प्रश्नांसंदर्भात सर्व शिक्षक वर्गाचे प्रबोधन करावे.

(३) प्रत्येक शाळेमध्ये अध्ययन अक्षम असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेण्यासाठी शिक्षक/विशेष शिक्षकांची समिती स्थापन करावी.

(४) विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी काटेकोरपणे करण्यात यावी.

(५) ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची अक्षमतेसंदर्भात पडताळणी करण्यासाठी प्रादेशिक भाषेमध्ये चांचण्या उपलब्ध करुन द्याव्यात.

(६) या चांचण्या संपूर्ण राज्यासाठी समान असाव्यात.